महाराष्ट्र शासन (वन विभाग)

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती वनवृत्त, अमरावती यांचे कार्यालय.**

**कॅम्प परिसर, अमरावती - 444602**


दुरध्वणी दुरध्वनी क्र. (0721) 2662090/ 2662593/ 2662680(वैयक्तिक)फॅक्सक्र. 2663314

ई-मेल :ccftamravati@mahaforest.gov.in/ aticcfa@gmail.com/ हॅलो फॉरेस्ट (नि:शुल्क) 1926


**आदेश क्रमांक :** 233 **दिनांक :** 29/01/2026

**विषय : लिपीक पदावरुन लेखापाल पदावर पदोन्नती आदेश.**

**संदर्भ :**1. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन 12, दिनांक 01/08/2019
2. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दिनांक 07/05/2021
3. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग 2022/प्र.क्र.83/16-अ/ दिनांक 20/04/2023
4. विभागीय पदोन्नती समिती व नागरी सेवा मंडळ समितीची सभा दिनांक 29/01/2026

लिपीक संवर्गातुन लेखापाल संवर्गात निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याकरीता विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक 29/01/2026 रोजी संपन्न झाली. विभागीय पदोन्नती समितीच्या सभेत पदोन्नतीस पात्र ठरविण्यात आलेल्या खालील कर्मचाऱ्याला दिनांक 29/01/2026 रोजी पार पडलेल्या नागरी सेवा मंडळाचे बैठकीत, समितीने पदस्थापनेच्या बाबतीत केलेल्या शिफारशीनुसार लेखापाल पदावर निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात पदोन्नतीचे आदेश खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

1. सुधारित वेतन संरचनेनुसार गट-क लिपीक (एस-6:19900-63200) या संवर्गातून गट-क लेखापाल (एस-10:29200-92300) या संवर्गा करिता पात्र असलेल्या लिपीकांसाठी दिनांक 29/01/2026 रोजी पदोन्नती समितीची बैठक पार पडली आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त समितीने विचारात घेतले.
2. पदोन्नती संदर्भात सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दिनांक 20 एप्रिल 2021 चा शासन निर्णय अधिक्रमीत करुन सामान्य प्रशासन शासन निर्णय क्रमांक बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दिनांक 07 मे 2021 सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यांत आले असुन त्यात नमुद केले आहे की, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक 2797/2015 या प्रकरणी दिनांक 04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले आहे. मात्र मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक 25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यांत येत आहे.
3. लेखापाल या संवर्गातील सर्व सेवा शर्ती संबंधिताला बंधनकारक राहतील.
4. सदर कर्मचारी यांना निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात देण्यात आलेली पदोन्नती कोणतीही पुर्व सूचना वा नोटीस न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखुन ठेवीत आहे.
5. लेखापाल पदावर पदोन्नतीने रूजू झालेल्या कर्मचारी यांना जेष्ठतेबाबत महाराष्ट्र नागरी सेवा जेष्ठतेचे विनियम नियमावली 2021 च्या तरतुदी लागु राहतील.
6. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-1015/प्र.क्र.-1/65/12 दिनांक 08/जुन/1995 अन्वये कालबध्द पदोन्नती व शासन निर्णय क्रमांक वेतन-1999/प्र.क्र.-2/92/सेवा-3 दिनांक 20 जुलै 2001 अन्वये आश्वासित प्रगती योजना शासकीय कर्मचा-यांना लागु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ज्या कर्मचा-यांनी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेतलेला आहे, अशा कर्मचा-यांनी पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला कालबध्द पदोन्नतीचा किंवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ काढून घेण्यात येईल.
7. या आदेशाद्वारे पदोन्नत करण्यात आलेले कर्मचारी ज्या तारखेला पदस्थापना दिलेल्या ठिकाणी रूजू होतील त्या तारखेला त्यांची पदोन्नतीचे पदावर वेतननिश्चिती करण्यात येईल. तथापी ज्या कर्मचा-यांची लेखापाल या पदावर पदोन्नतीसाठी निवड करण्यात आलेली आहे, अशा कर्मचाऱ्यांनी पदोन्नती नाकारल्यास त्यांचे नाव निवड यादीतून काढुन टाकण्यांत येईल व पुढील 2 वर्षी होणाऱ्या निवडसूचीमध्ये संबंधित कर्मचा-यांचे नावाचा विचार करण्यांत येणार नाही. तसेच त्यांना यापुर्वी आश्वासित प्रगती

योजने अंतर्गत लाभ दिले गेलेले असल्यास ते काढुन घेण्यात येतील याची नोंद घ्यावी.

8. सदरचे आदेश हे संबंधित विभागाकडून प्राप्त माहितीच्या आधारे निर्गमित करण्यात येत आहे. करीता, सदर आदेश प्राप्त होण्यापुर्वी ज्या कर्मचा-याविरूध्द विभागीय चौकशी सूरू करण्यात आली असेल, अथवा, त्यांना निलंबनाखाली ठेवण्यात आले असेल तर सदर कर्मचा-यांना पदोन्नतीचे आदेश लागु राहणार नाही.

9. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक वशिअ-1214/प्र.क्र.26/11 दिनांक 02 जुन 2014 अन्वये, पदोन्नती करिता मत्ता व दायित्व याची वार्षिक विवरण पत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक 28 मे 2018 नूसार महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) (सुधारणा) नियम, 2018 नुसार संगणक हाताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक ठरविले आहे. ज्या शासकिय सेवकाने वयाची 50 वर्ष पुर्ण केली असेल त्यांना प्रमाणपत्र सादर करण्यापासून सुट मिळेल अशी तरतुद आहे. त्या प्रमाणे संबंधीत कार्यालय प्रमुखाने सदर विवरणपत्रे/संगणक प्रमाणपत्र अथवा सुट दिल्याबाबत खात्री करुनच पदोन्नतीचे आदेश संबंधित कर्मचा-यांस निर्गमित करावे.

10. वरील नमूद अटि व शर्तीचे अधिन राहून खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात लेखापाल पदावर पदस्थापना खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | लिपीकाचे नांव व पदनाम | कार्यरत विभाग | प्रथम नियुक्ती प्रवर्ग | पदोन्नत लेखापाल पदाचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1. | राजु हरिसिंग राठोड | सामाजिक वनीकरण विभाग, बुलडाणा. | विजा-अ | खुला | लेखापाल, विभागीय कार्यालय, बुलडाणा (प्रादे.) वनविभाग, बुलडाणा. | रिक्त पदी |
| 2. | भगवान वामन भगत | अकोला वन विभाग, अकोला. | अ.जा. | खुला | लेखापाल, विभागीय कार्यालय, अकोला (प्रादे.), वनविभाग, अकोला. | (अंध व अल्पदृष्टी) या दिव्यांग प्रकारातुन |
| 3. | सुशांत रामराव कवाने | सामाजिक वनीकरण विभाग, अमरावती | खुला | खुला | लेखापाल, विभागीय कार्यालय, अमरावती (प्रादे.), वनविभाग, अमरावती. | (कर्णबधिरता) या दिव्यांग प्रकारातुन |

11. सदर आदेश तात्काळ प्रभावाने अमलात येतील, पदस्थापने करीता वरील प्रमाणे नमूद केलेल्या कार्यालयात तात्काळ रूजू व्हावे.

12. पदोन्नती पदस्थापना ही संपूर्णपणे प्रशासकीय बाब असल्यामूळे कोणत्याही कर्मचाऱ्याने पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणेबाबत राजकीय दबाव वापरल्यास, त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियम 23 चा भंग केला म्हणून ती कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील.

Jayoti Banerjee 29/1/26

(जयोती बॅनर्जी)
**मुख्य वनसंरक्षक**
**(प्रादेशिक), अमरावती.**

**कक्ष-8/आस्था/TN-1/पदोन्नती/**3500 **/2025-26**
**अमरावती-2, दिनांक** : 29/01/2026

**प्रति,**

वरील अ.क्र. 01 ते 03 लिपीक सर्व.
**मार्फत-** संबंधित नियंत्रक अधिकारी

**प्रतिलीपी** : अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य नागपुर यांना माहितीस सविनय सादर.
**प्रतिलीपी** : वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांना माहितीस अग्रेषित.
**प्रतिलीपी** : उपवनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, अमरावती यांना माहिती करीता अग्रेषित.

**प्रतिलीपी** : उपवनसंरक्षक, अमरावती / अकोला / बुलडाणा वनविभाग यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित.

**प्रतिलीपी** : विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अमरावती / बुलडाणा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

**प्रतिलीपी** : आदेश फाईल.

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) :: अमरावती ::